# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government of Maharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4 Dated 27th Sept. 2011 & Presently a State University governed by Maharashtra Public University Act, 2016 (Maharashtra Act No. VI of 2017)

## Office of the Director Students' Development

**Dr. Priya Gedam**
**Director (I/C)**
**(Department of Students'Devolopment**

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: unigug.org/ gondwana.digitaluniversity.ac
**Email :** nssdsw.gug@ gmail.com


**पत्र क्र. No.GU/DSD / 265 /2018** **Dt: 05/02/2018**

प्रति,
मा. प्राचार्य,
संलग्नीत महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**विषय : "सोशल मीडीया महामित्र" हा उपक्रम आपल्या महाविद्यालयात राबविण्याबाबत.**

संदर्भ :— माहिती व जनसंपर्क महासचिवालय महाराष्ट्र शासन, यांचे दि. १८ जानेवारी २०१८ चे ई. मेल.

महोदय

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, आधुनिक युगातील वेगवान संपर्क साधनांचा विधायक उपयोग करून घेण्यासाठी "सोशल मीडीया महामित्र" हा उपक्रम माहिती व जनसंपर्क महासचिवालय महाराष्ट्र शासन, यांच्या वतीने राबविण्यात येत आहे. तरी आपल्या महाविद्यालयातील अधिकाधिक विद्यार्थी या उपक्रमामध्ये सहभागी होतील यासाठी आपण प्रयत्न करावेत व आपल्या महाविद्यालयात सदर उपक्रम राबवून सहकार्य करावे हि विनंती.

धन्यवाद!

(डॉ. प्रिया गेडाम)
संचालक (प्र.)
विद्यार्थी विकास विभाग
गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली.

**संलग्न** :— शासनाचे पत्र.

ब्रिजेश सिंह भा.पो.से.
सचिव (माहिती व जनसंपर्क)

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दि. १८ जानेवारी २०१८

सप्रेम नमस्कार !

भारत हा तरुणांचा देश आहे, असे म्हटले जाते. भारतातील बहुतांश तरूण फेसबुक, व्हॉट्सअॅप, ट्विटर, इन्स्टाग्राम वा तत्सम सोशल मीडियाचा मोठ्या प्रमाणात उपयोग करीत असतात. सोशल मीडिया हे ज्ञान आणि मनोरंजनाचे सहज उपलब्ध असे आणि प्रभावी साधन आहेच पण लोकांची मने व मते घडवण्याची ताकद सोशल मीडियामध्ये असल्याचे अनेकदा सिद्ध झाले आहे.

आधुनिक युगातील वेगवान संपर्क साधनाचा विधायक उपयोग करून घेण्यासाठी आणि तरूणांना अधिकाधिक वाव देऊन समाज अधिक विवेकी व्हावा यासाठी 'सोशल मीडिया महामित्र' हा उपक्रम राबविण्याचे राज्य शासनाने ठरविले आहे.

या उपक्रमात प्रारंभी प्रत्येक तालुक्यातून (क्षेत्रातून) प्रत्येकी १० 'सोशल मीडिया महामित्र' निवडले जातील. या १० जणांना जिल्हास्तरावर विशेष कार्यक्रमासाठी आमंत्रित केले जाईल या महामित्रांची त्या जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलिस आयुक्त, पोलिस अधीक्षक यांच्या समवेत समाज माध्यमाच्या सदुपयोगाबाबत गटचर्चा आयोजित करण्यात येईल. या गटचर्चेअंती तालुक्यातील (क्षेत्रातील) प्रत्येकी एका महामित्राची राज्यस्तरावर होणाऱ्या कार्यक्रमासाठी निवड करण्यात येईल. जिल्हास्तरावरील कार्यक्रम सर्वसाधारणत: ५ ते १७ मार्च या कालावधीत होईल.

मा. मुख्यमंत्री महोदयांच्या उपस्थितीत होणाऱ्या राज्य स्तरावरील कार्यक्रमात समाज माध्यम क्षेत्रात प्रभावी असलेले विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवरांना आमंत्रित करण्यात येईल. या कार्यक्रमात 'सोशल मीडिया महामित्र' पुरस्कार देण्यात येईल तसेच या सर्वांच्या उपस्थितीत मान्यवरांशी संवाद आयोजित करण्यात येईल. हा कार्यक्रम मार्च महिन्यात शेवटच्या आठवड्यात होईल.

या उपक्रमामध्ये सहभागी होण्याकरिता 'Google play store' अथवा Apple च्या App Store वर MahaMitra हे अॅप्लीकेशन डाऊनलोड करावे लागेल. या अॅप्लीकेशनमध्ये नाव, वय, पत्ता हे तपशील देऊन नोंदणी करावयाची आहे. ही नोंदणी प्रक्रिया दिनांक १ फेब्रुवारी रोजी सुरू होणार असून १८ फेब्रुवारीपर्यंत नोंदणी करता येणार आहे. यामध्ये महाराष्ट्रातील १५ वर्षांवरील कोणीही रहिवासी नि:शुल्क सहभागी होऊ शकेल.

आपल्या महाविद्यालयातील अधिकाधिक विद्यार्थी या उपक्रमामध्ये सहभागी होतील यासाठी आपण प्रयत्न करावेत, ही विनंती.

या उपक्रमाबाबत सविस्तर माहितीसाठी 'अनुलोम' संस्थेचे प्रतिनिधी आपल्याशी संपर्क साधून उपक्रमाशी संबंधित माहितीचे प्रसिद्धी साहित्य आपल्याकडे जानेवारी २०१८ च्या शेवटच्या आठवड्यात पोहोचवतील.

कृपया सहकार्य व्हावे.

(ब्रिजेश सिंह भा.पो.से.)

प्रति,

सर्व प्राचार्य

Dr Gedam

ई-मेल : dg.dgipr@maharashtra.gov.in | कार्यालय दूरध्वनी क्रमांक : ०२२-२२०२ ७९५६

Scanned by CamScanner

68% 10.37 AM

# सोशल मीडिया महामित्र

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

सत्यमेव जयते

typing...

TODAY

**DGIPR**

सोशल मीडियामध्ये ॲक्टिव्ह आहात? 10.20 AM

हो आहे 10.22 AM

**DGIPR**

मग सिद्ध करा तुमची सोशल मीडियाची क्षमता 10.23 AM

काय आहे हा उपक्रम? 10.25 AM

**DGIPR**

सोशल मीडिया महा मित्र

विधायक संदेश-विवेकी समाज

सोशल मीडियाचा सदुपयोग करणाऱ्या प्रभावी व्यक्तींचा सन्मान करण्याचा हा उपक्रम आहे.

10.27 AM

मी का सहभागी व्हावे? 10.28 AM

**DGIPR**

मान्यवरांना प्रत्यक्ष भेटण्याची, सेल्फी घेण्याची
तसेच सोशल मीडियात सक्रीय मंडळींसोबत विचार व्यक्त करण्याची संधी.
10.30 AM

अजून काय असेल यात? 10.31 AM

**DGIPR**

मा. मुख्यमंत्र्यांच्या स्वाक्षरीने डिजिटल प्रशस्तीपत्र आणि खूप काही ... 10.32 AM

व्वा! Coool! पण सहभागी कसं व्हायचं? 10.34 AM

**DGIPR**

सहभागी होण्यासाठी `mahamitra´ App Download करा

GET IT ON Google Play

Download on the App Store

mahamitra

वेबसाइट - www.mahamitra.in नोंदणी १ ते १८ फेब्रुवारी... 10.35 AM

**DGIPR**

चला, आताच नोंदणी करा आणि तुम्ही 'महामित्र' असल्याचे सिद्ध करा... 10.37 AM